बुधवार दि.१२ फेब्रुवारी २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत    संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१४७ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in


# कॉपी करण्यास मदत करणाऱ्या शिक्षकांवर बडतर्फीची कारवाई-मुख्यमंत्र्यांचे आदेश

## मास कॉपी होणाऱ्या परीक्षा केंद्रांची मान्यता रद्द होणार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

दहावी व बारावी बोर्डाच्या परीक्षेत एखाद्या केंद्रावर मास कॉपी अर्थात सामूहिक कॉपी करण्याचा प्रकार घडला तर त्या केंद्राची मान्यता कायमस्वरुपी रद्द करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेत. एवढेच नाही तर विद्यार्थ्यांना कॉपी करण्यासाठी मदत करणाऱ्या शिक्षक व कर्मचाऱ्यांवर बडतर्फीची कारवाई करण्याचे निर्देशही त्यांनी दिलेत. या निर्देशामुळे या परीक्षा कॉपीमुक्त होण्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीत फडणवीस यांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी व पोलिस अधिकाऱ्यांकडून परीक्षेच्या तयारीचा आढावा घेतला. त्यावेळी त्यांनी उपरोक्त आदेश दिले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्यासह इतर मंत्री उपस्थित होते. यावेळी शिक्षक विभागाने दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च या कालावधीत ५ हजार १३० केंद्रांवर होणार असल्याचे नमूद करत यासंबंधीची सर्व तयारी पूर्ण झाल्याची माहिती दिली.




मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, सर्वच परीक्षा केंद्रांवर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत विशेष बैठ्या पथकांची नियुक्ती केली जावी. या पथकाने परीक्षा सुरू होण्यापूर्वी एक तास अगोदर परीक्षा केंद्रावर पोहोचावे. त्यानंतर परीक्षा संपल्यानंतर उत्तरपत्रिका कस्टोडियनकडे जमा करेपर्यंत स्थितीवर नियंत्रण ठेवावे. विशेषतः संवेदनशील केंद्रांवर कार्यक्षम व वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठ्या पथकांत नियुक्ती केली जावी. तसेच अशा परीक्षा केंद्रांवर ड्रोन कॅमेऱ्यांद्वारे व व्हिडिओ कॅमेऱ्यांद्वारे पूर्णवेळ निगराणी करावी. सर्व तालुक्यांतील परीक्षा केंद्रांवर पुरेसा बंदोबस्त, बैठी पथके, ड्रोन व व्हिडिओ कॅमेरे कार्यरत असावेत. तसेच यावर निगराणी ठेवण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्येक तालुक्यासाठी एक विभागप्रमुख, उपजिल्हाधिकारी यांची नियुक्ती करावी.बोर्डाची परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पाडण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या खांद्यावर संयुक्तपणे राहील. शहरी भागात पोलिस आयुक्त व महापालिका हद्दीत आयुक्त ही जबाबदारी पाहतील. इंग्रजी भाषा, गणित व विज्ञान विषयाच्या परीक्षेच्या दिवशी जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संवेदनशील केंद्रांना स्वतः भेटी द्याव्यात, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.दुसरीकडे, बारावीच्या ११ फेब्रुवारी ते १८ मार्चपर्यंत होणाऱ्या परीक्षेसाठी राज्यभरातील १५ लाख ५ हजार ३७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. यात ८ लाख १० हजार ३४८ विद्यार्थी,



तर ६ लाख ९४ हजार ६५२ विद्यार्थिनी आहेत. यंदा ३७ तृतीयपंथीही परीक्षेसाठी बसले आहेत. या पैकी ७ लाख ६८ हजार ९६७ विद्यार्थी विज्ञान शाखेची परीक्षा देणार आहेत. ३ लाख ८० हजार ४१० विद्यार्थी कला शाखेची तर ३ लाख १९ हजार ४३९ विद्यार्थी वाणिज्य शाखेची परीक्षा देणार आहेत. बोर्डाने ही परीक्षा 'कॉपीमुक्त' करण्यासाठी २७१ भरारी पथकांची नियुक्ती केली आहे.

### कॉपीमुक्त परीक्षेची अंमलबजावणी करा–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिक्षण विभागासह पोलिस**



**प्रशासनाला विविध सूचना केल्या. ते म्हणाले, परीक्षा केंद्र परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १६३ ची कडक अंमलबजावणी करण्यात यावी, परीक्षा केंद्रावर व १०० मीटर परिसरात अनाधिकृत व्यक्तींना पूर्णत: प्रतिबंध करण्यात यावा, परीक्षा केंद्रात प्रवेश देताना विद्यार्थी कोणत्याही प्रकारचे कॉपी करण्याचे साहित्य (पुस्तके, नोटस्, मोबाईल इ.) जवळ बाळगणार नाहीत, याची खबरदारी घ्या. भरारी पथकांद्वारे कॉपीमुक्त परीक्षेची प्रभावी अंमलबजावणी अपेक्षीत आहे, असे ते म्हणाले.**

### गैरप्रकारांना उद्युक्त करणाऱ्यांवर दाखल होणार गुन्हा

**सर्व परीक्षार्थ्यांना परीक्षेच्या अर्धा तास आधी केंद्रावर हजर राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांना १० मिनिटे वाढवून दिले जाणार आहेत. यापूर्वी पेपरच्या अगोदर १० मिनिटे वाढवून दिले जात होते, परीक्षा केंद्रावर गैर प्रकार घडल्यास गैरप्रकारांना उद्युक्त करणारे, मदत करणारे यांच्यावर देखील पात्र आणि अजामीन पात्र गुन्हा दाखल केला जाणार आहे. संवेदनशील परीक्षा केंद्रावर ड्रोन कॅमेराद्वारे निगराणी ठेवली जाणार आहे. परीक्षा केंद्रावर गैरप्रकार आढळल्यास संबंधित केंद्राची मान्यता कायमस्वरूपी रद्द केली जाणार आहे. तसेच प्रश्नपत्रिका फुटू नये म्हणून जीपीएससह लाइव्ह ट्रॅकिंग, व्हिडीओ चित्रीकरणही केले जाणार आहे.**

# लाईफलाईन अबॅकस क्लासेसच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश!

## पहिल्याच वर्षी पटकावली चॅम्पियन ट्रॉफी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

अहिल्यानगर येथे नुकत्याच झालेल्या नॅशनल लेवल अबॅकस स्पर्धेत कडा येथील लाईफलाईन अबॅकस क्लासेसच्या चार पैकी चार विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.




नुकत्याच झालेल्या नॅशनल लेव्हल अबॅकस स्पर्धेमध्ये लाईफलाईन अबॅकस क्लासेसच्या चार विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता.यामध्ये चॅम्पियनची ट्रॉफी पटकावत अनुष्का अरुण ओव्हाळ हिने सर्वांचे लक्ष वेधले. तसेच सिद्धी परसराम हंबर्डे आणि समृद्धी योगेश बोडखे या विद्यार्थिनींनी द्वितीय क्रमांक मिळवला तर सफा मोहसीन पठाण हिने तृतीय क्रमांक मिळविला.


अनुष्का अरुण ओव्हाळ या विद्यार्थिनीचा शंभर टक्के अचूक उत्तरांसाठी विशेष सन्मान करण्यात आला. यशस्वी विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे लाईफलाईन अबॅकस क्लासेस चे संचालक साजिद पठाण सर यांनी अभिनंदन केले.

# कुंडलवाडी येथील विविध ठिकाणचे अतिक्रमण काढण्याची जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**कुंडलवाडी । गंगाधर दुसलवाड**

कुंडलवाडी येथील विविध ठिकाणाचे अतिक्रम हटवावे अशा मागणीचे निवेदन सामाजिक कार्यकर्ते क्षीनिवास नरवाड यांनी नांदेड येथे नुतन जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांची भेट घेऊन दिले दिलेल्या निवेदनात असे नमुद करण्यात आले की शहरातील जोड मारुती मंदिर ते टॉप मॅन टेलर यांच्या दुकानापर्यंत डॉक्टर सूर्यवंशी यांच्या दवाखाना पासून ते डॉक्टर हेडगेवार चौक व लोकनेते गोपीनाथ मुंडे चौक पर्यंत डॉक्टर हेडगेवार चौक ते इंडियन गॅस एजन्सी पर्यंत अगोदर रस्त्यावरचे अतिक्रम हटविण्यात यावे आणि मुख्य बाजार बरीच दुकाने हात गाडी व दुकानाचे पाढे नगरपालिकेच्या रोडावर थाटत असून त्यांना नवीन जागा उपलब्ध करून देण्यात यावे जेने करून नागरिकांना त्रास होणार नाही याची गंभीर



आणि दखल घेऊन अतिक्रम मुक्त शहर करण्यात यावे आणि शहराच्या विकासासाठी शासनाकडून जो निधी येतो त्यांच्या व्यवस्थित वापर करून गुणवत्ता पूर्णपणे काम करण्यात यावे अशी मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी नांदेड यांना देण्यात आले या निवेदनाची प्रत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे साहेब यांना पण पाठविण्यात आले दिलेल्या निवेदनावर सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास नरवाड किसन कुडमुलवार डॉक्टर नरेश बोधनकर मोहम्मद इस्माईल इश्शु अशोक पडकुटलावार पांडुरंग सरगिरे आदींचे स्वाक्षऱ्या आहेत.

# मनुष्य बळाअभावी गुळ उद्योगाला लागली घरघर

लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

१५ ते २० वर्षापूर्वी कंधार तालुक्यातील अनेक गावांत गुऱ्हाळे अस्तित्वात होती. साधारणतः दिवाळी ते गुढीपाडवा दरम्यान गुऱ्हाळ सुरू असायची. मात्र सध्या कामगारांचा तुटवडा, वाढता उत्पादन खर्च, गुळदरात होत असलेली घसरण, आदींसह कारणांमुळे गुळ उद्योगाला घरघर लागली असून, त्यामुळेच शेतकरी धुराडे पेटविण्याची हिंमत करीत नाहीत.परंतु, तालुक्यातील काही गावांत सध्या बोटावर मोजण्या इतपत गुऱ्हाळाची संख्या आहे,

मागच्या २० वर्षांपूर्वी कंधार तालुक्यातील प्रत्येक गावात १ ते ३ शेतकऱ्यांच्या शेतात गुऱ्हाळ सुरु असायचे. दिवाळी पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर सुरु झालेली गुऱ्हाळे गुढीपाडव्यापर्यंत चालत. गुऱ्हाळ सुरु



झाले कि गावातील नागरिक, मित्र परिवार,सगेसोयरे रस पिण्यासाठी,गुळ खाण्यासाठी तर लहान मुले चोखनी खाण्यासाठी गर्दी करत. शेतकरी गुळाचा पाक डेऱ्यामध्ये भरुन ठेवून वर्षभर ते खात असत. मात्र सध्या गुळाची जागा साखरेने घेतली असून मध्यंतरी गुळाचा पडलेला भाव, गुळ निर्मितीचा वाढलेला,खर्च अन् गुऱ्हाळ कामाला मनुष्यबळाचा अभाव, वाढती साखर कारखानदारी आदींसह कारणांमुळे गुळ उद्योगाला घरघर लागून बघता बघता गुऱ्हाळे गावांतून गायब झाली.

गुऱ्हाळासाठी प्रसिद्ध असलेल्या कंधार तालुक्यातील बहाद्दरपुरा, फुलवळ, गऊळ, बाचोटी, संगुचीवाडी, जंगमवाडी, बिजेवाडी, पानभोसी,आदी गावांत एकही गुऱ्हाळघर शिल्लक राहिले नाही.एक गुऱ्हाळ चालविण्यासाठी गुळव्या, जाळव्या, कडाईवाला, क्रर्षल चालवणे, ऊस तोडणी, वाहतूक आदी कामांसाठी किमान २० व्यक्ती लागत होते. तेवढ्या प्रमाणात कामासाठी माणस उपलब्ध होत नाहीत. माणस मिळाली तर गुळव्या आणि जाळव्या मिळत नाही, अशा अनंत अडचणीमुळे शेतकरी कारखान्यांना पसंती देताना दिसत आहेत. कारखाना आणि गुळ याचा विचार केला तर कारखान्यांपेक्षा गुळ उद्योग आजच्या परिस्थितीत परवडणारा असून कारखान्याला एका टनाचे ३ हजार रुपये मिळतात तर गुळ विक्रीतून खर्च वजा जाता शेतकऱ्यांना ४५०० रुपये मिळतात. केवळ मनुष्यबळाअभावी शेतकऱ्यांना नाईलाजास्तव कारखान्यांना ऊस द्यावा लागत असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले,

# अहमदपूर विधीज्ञ संघाच्या अध्यक्षपदी ॲड.नाथराव देमगुंडे,सचिव अजिंक्य चामे तर सहसचिव पदी सत्यवान मुंढे यांची निवड



लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहमदपूर । विष्णू मोहन पोले**

अहमदपूर विधीज्ञ संघाच्या नूतन कार्यकारिणीची निवड सर्वानुमते पार पडली. अध्यक्षपदी ॲड.नाथराव देमगुंडे, उपाध्यक्षपदी सुहास चाटे, सचिवपदी अजिंक्य चामे, सहसचिवपदी ॲड.सत्यवान मुंढे, कोषाध्यक्षपदी जुनेद सौदागर, तर ग्रंथपालपदी ॲड.कटकेमोड यांची निवड करण्यात आली.ही निवड मावळते अध्यक्ष ॲड.विजयकुमार शेळके यांच्या अध्यक्षतेखाली विधीज्ञ कक्षात पार पडलेल्या बैठकीत करण्यात आली. यावेळी उपस्थित सर्व सदस्यांनी एकमताने नव्या कार्यकारिणीला संमती दिली. बैठकीला ॲड.भगवानराव पौळ, ॲड.हेमंत पाटील, ॲड.धनराज घोगरे, ॲड.विजय शेळके, ॲड.किरण जाधव,ॲड.प्रदीप जाधव, ॲड.रवि भुरकापल्ले, ॲड.विजय मुसने,ॲड.सुहास देशमुख, ॲड.संग्राम फड यांच्यासह विधीज्ञ संघातील अनेक सदस्य उपस्थित होते.नवीन कार्यकारिणीने संघाच्या हितासाठी भरीव कामगिरी करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

# महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**





महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या थाटात संपन्न झाला. यशवंत, गुणवंत विद्यार्थी व प्राध्यापकांचा सन्मान या समारंभात करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्थेचे माध्यमिक विभागाचे सहसचिव प्राचार्य बंडू पवार उपस्थित होते. ते म्हणाले की, तरुणांनी कौशल्यपूर्ण शिक्षण घेऊन आपल्या जीवनात यशस्वी व्हावे. अभ्यासातून आपले कर्तुत्व सिद्ध करा. या समारंभासाठी सुप्रसिद्ध रानकवी तुकाराम धांडे यांनी बहारदार शब्दात निसर्ग कविता सादर केल्या. विद्यार्थ्यांनी आपल्या माय मातीशी घट्ट नाते ठेवावे. निसर्गावर व शेतीवर प्रेम करा.

असा संदेश त्यांनी दिला. या समारंभाचे प्रमुख वक्ते डॉ.अरुण शिंदे म्हणाले की, सुंदर आनंददायी आयुष्य जगण्यासाठी आरोग्याची काळजी घ्या. असे ते म्हणाले. परिक्रमा संकुलाच्या प्रमुख प्रमुख डॉ. प्रतिभाताई पाचपुते म्हणाल्या की, युवकांनी याच काळात कष्ट करावे. आपल्या जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रयत्न करावा. माजी आमदार राहुल जगताप यांनी यशस्वी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी अभ्यासातून आपले व्यक्तिमत्व प्रकट करा आणि मनसोक्त जगा असा संदेश त्यांनी दिला. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बाबासाहेब भोस होते. आपले महाविद्यालय अत्यंत प्रतिकूल अशा परिस्थितीतून उभे राहिले आहे. युवकांनी अभ्यास करून मोठे व्हावे. असा संदेश त्यांनी दिला. उपविभागीय अधिकारी नवनाथ बोडके यांनीही मोलाचे विचार व्यक्त केले. प्रास्ताविक प्रभारी प्राचार्य डॉ. महादेव जरे यांनी केले. अहवाल वाचन डॉ. बापू देवकर, प्रा. कल्पना बागुल, प्रा. संजय डफळ यांनी केले. समारंभासाठी महावीर पटवा, कुंडलिकराव दरेकर, उपनगराध्यक्ष ज्योतीताई खेडकर, राजू गोरे, सतीश मखरे, पिटर रणसिंग, रवीशेठ दंडनायक ,प्राचार्य दिलीप भुजबळ, मुख्याध्यापिका गीता चौधरी, नितीन अण्णा डुबल , प्रा. सौ. सुनीता सोनावळे , श्री रघुनाथ लबडे, डॉ. प्रकाश साळवे, डॉ. सुदाम भुजबळ, डॉ. नितीन थोरात इत्यादी उपस्थित होते.सूत्रसंचालन प्रा. शहाजी मखरे, डॉ. राम ढगे यांनी केले. वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाच्या निमित्ताने भव्य तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांनाही उदंड प्रतिसाद लाभला. या समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभागीय अधिकारी नवनाथ बोडके म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी खेळ आवश्यक आहे. या समारंभासाठी कुंडलिकराव दरेकर इतर मान्यवर मंडळी, प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## केजरीवाल यांच्या पराभवाचे खरे कारण

# भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे ढासळलेली प्रतिमा!

लोकनेता न्यूज नेटवर्क

पूर्वीच्या निवडणुकांमध्ये अरविंद केजरीवाल यांनी स्वतःला स्वच्छ, प्रामाणिक आणि भ्रष्टाचाराविरोधी नेता म्हणून सादर केले. त्यांनी प्रस्थापित राजकारणाविरोधात संघर्ष करणारा आम आदमी नेता म्हणून ओळख निर्माण केली, ज्यामुळे AAP ला मोठे यश मिळाले. मात्र, अलीकडील दिल्ली विधानसभा निवडणुकीत केजरीवाल यांची प्रतिमा मोठ्या प्रमाणात धक्का बसला. या गोष्टीमुळे मतदारांचा विश्वास कमी झाला आणि त्याचा थेट परिणाम त्यांच्या पराभवावर झाला. (अ) भ्रष्टाचाराचे आरोप आणि विश्वासहानी केजरीवाल यांच्या स्वच्छ प्रतिमेला सर्वात मोठा धक्का दिल्ली दारू घोटाळ्याच्या आरोपांमुळे बसला. माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया आणि आरोग्यमंत्री सत्येंद्र जैन यांच्या अटकेमुळे AAP सरकारवरील भ्रष्टाचाराचे आरोप गंभीर बनले. भाजपने या प्रकरणाचा जोरदार प्रचार केला आणि केजरीवाल यांना भ्रष्ट नेत्यांचे रक्षण करणारे म्हणून दाखवले. यामुळे मतदारांना वाटू लागले की, एकेकाळी पारदर्शकतेसाठी ओळखला जाणारा AAP आता इतर पक्षांसारखाच भ्रष्ट बनला आहे. त्याचबरोबर, केजरीवाल यांनी या आरोपांवर कठोर कारवाई करण्याऐवजी आपल्या नेत्यांचे सातत्याने समर्थन केले. हे त्यांच्या आधीच्या भ्रष्टाचारविरोधी भूमिकेशी विसंगत होते, त्यामुळे मतदारांचा त्यांच्यावरचा विश्वास कमी झाला. (ब) संघर्षप्रधान राजकारणाचा फटका केजरीवाल यांनी नेहमीच केंद्र सरकार, दिल्लीच्या नायब राज्यपाल आणि प्रशासकीय यंत्रणांसोबत संघर्षात्मक भूमिका घेतली. सुरुवातीला ही भूमिका दिल्लीच्या स्वायत्ततेसाठी लढणाऱ्या नेत्याची वाटली, परंतु कालांतराने ती अडथळा आणणारी आणि फक्त संघर्ष करणारी वाटू लागली. त्यांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपवर वारंवार आरोप करणे, अनेकदा ठोस पुराव्याशिवाय, यामुळे ते अधिक जबाबदार मुख्यमंत्री वाटण्याऐवजी केवळ विरोध करणारे नेते वाटू लागले. मतदारांमध्ये हे एक नकारात्मक छायाचित्र निर्माण झाले. (क) नेतृत्व आणि निर्णय प्रक्रियेबाबत प्रश्नचिन्हेAAP च्या सुरुवातीच्या काळात हा पक्ष लोकशाहीवादी वाटत होता, पण नंतर संपूर्ण सत्ता केजरीवाल यांच्या हातातच आहे, अशी धारणा निर्माण झाली. योगेंद्र यादव, प्रशांत भूषण, कुमार विश्वास यांसारख्या महत्त्वाच्या नेत्यांना पक्षातून काढून टाकण्यात आले. पक्षात वेगवेगळ्या मतांना स्थान नाही, आणि AAP हा केवळ एक one-man show पक्ष बनला आहे, असे मत तयार झाले. यामुळे AAP वर विश्वास ठेवणाऱ्या मतदारांना पक्ष हा खऱ्या लोकशाही तत्त्वांपासून दूर जात आहे, असे वाटू लागले. (ड) भाजपच्या राष्ट्रवादी प्रचाराला कमकुवत प्रतिसाद भाजपने या निवडणुकीत राष्ट्रवाद, राम मंदिर, कलम ३७० हटवणे आणि राष्ट्रीय सुरक्षेचे मुद्दे यावर भर दिला. त्यामुळे हिंदू मतदारांचा कल भाजपकडे वळला. केजरीवाल यांनी काही वेळा 'हनुमान चालीसा' पठण करून आणि मंदिरे भेट देऊन सॉफ्ट हिंदुत्व स्वीकारण्याचा प्रयत्न केला, पण तो केवळ राजकीय खेळी वाटली. त्यामुळे भाजप समर्थक हिंदू मतदार त्यांच्याकडे गेले नाहीत, आणि त्याच वेळी काही धर्मनिरपेक्ष मतदार त्यांच्यापासून दुरावले. (इ) महत्त्वाच्या मुद्द्यांवर मौन आणि संभ्रमित भूमिका केजरीवाल यांनी अनेक महत्त्वाच्या राष्ट्रीय मुद्द्यांवर भूमिका घेण्यास टाळाटाळ केली, ज्यामुळे त्यांची प्रतिमा आणखी ढासळली. दिल्ली दंगली (२०२०) वर मौन: हिंदू–मुस्लिम तणावाच्या वेळी त्यांनी ठाम भूमिका घेतली नाही, ज्यामुळे दोन्ही गटातील मतदारांमध्ये नाराजी निर्माण झाली. शेतकरी आंदोलनावर उशिरा प्रतिक्रिया: पंजाबमध्ये सत्ता असूनही, त्यांनी शेतकरी आंदोलनावर वेळेत समर्थन दिले नाही. उइख आणि एऊ कारवाईवर दुटप्पी भूमिका: इतर पक्षांवरील कारवाईवर ते शांत राहिले, पण AAPनेत्यांवर कारवाई झाली तेव्हा त्यांनी विरोध केला. यामुळे ते संधीसाधू राजकारणी वाटू लागले. (फ) राजकीय संधीसाधूगिरीचा आरोप केजरीवाल यांचे राजकीय धोरण मतदारांच्या नजरेत संधीसाधू वाटू लागले. काँग्रेससोबत युतीचा गोंधळ: आधीAAPआणि काँग्रेस एकत्र लढणार असे सांगितले, नंतर काँग्रेसवरच टीका केली. त्यामुळे मतदार गोंधळले. दिल्लीऐवजी इतर राज्यांवर लक्ष: दिल्लीतील समस्यांकडे दुर्लक्ष करून पंजाब, गुजरात आणि इतर राज्यांत विस्तार करण्यावर भर दिला. यामुळे दिल्लीतील मतदार नाराज झाले.भाजपविरोधी आणि भाजपसमर्थक भूमिकेतील बदल: काहीवेळा भाजपवर जोरदार टीका, आणि काहीवेळा अप्रत्यक्ष समर्थन. यामुळे ते विश्वासार्ह वाटेनासे झाले. थोडक्यात, केजरीवाल यांचा पराभव हा केवळ भाजपच्या जोरदार प्रचारामुळे झाला नाही, तर त्यांच्या स्वतःच्या प्रतिमेतील घसरण याला मोठ्या प्रमाणात जबाबदार आहे. एकेकाळी प्रामाणिक, पारदर्शक आणि लोकाभिमुख नेता म्हणून ओळखले जाणारे केजरीवाल आता संधीसाधू, संघर्षप्रधान आणि राजकीय महत्त्वाकांक्षी नेता वाटू लागले. जर AAP ला पुन्हा यश मिळवायचे असेल, तर त्यांना मतदारांचा विश्वास पुन्हा मिळवावा लागेल, भ्रष्टाचाराचे आरोप दूर करावे लागतील, आणि लोकशाही तत्त्वांवर आधारित पक्ष चालवावा लागेल. त्याशिवाय, मतदार त्यांच्याकडे परिवर्तनाचे प्रतीक म्हणून पाहण्याची शक्यता कमीच आहे.

**डॉ.भारत कऱ्हाड, प्राचार्य**
**वराडकर महाविद्यालय दापोली.**

# सायबर सुरक्षा अभियानांतर्गत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



लोकनेता न्यूज नेटवर्क

**महागाव । विजय थोरात**

सायबर सुरक्षा अभियानांतर्गत विद्यार्थी मध्ये जनजागृती व्हावी या उद्देशाने महागाव येथील श्री कम्प्युटर क्लासेस चे संचालक मंगेश भाऊ वानखेडे यांनी शहरासह गावा गावा खेड्यापाड्यात जाऊन विविध उपक्रमातून शाळकरी विद्यार्थ्यासह नागरिकांना मार्गदर्शन केले. या मोहिमेचा उद्देश शाळकरी विद्यार्थ्यांना आणि नागरिकांना सायबर गुन्हे ऑनलाईन फसवणूक डिजिटल गोपनी आणि सुरक्षित इंटरनेट वापराबाबत जागृत करणे हा आहे. या मोहिमेतून शाळा व महाविद्यालय मध्ये कार्यशाळा विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा नियम पासवर्ड सुरक्षितता सोशल मीडिया धोके याबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे. तसेच ग्रामपंचायत व नगरपरिषद स्तरावर जनजागृती कार्यक्रम राबवून गावातील नागरिकांना डिजिटल व्यवहार करताना घ्यावयाची काळजी विषयी माहिती इंटरनेटवर सुरक्षितपणे बँकिंग व व्यवहार कसे करावे, मोफत सायबर हेल्पलाइन व माहिती पत्रके, सायबर गुन्ह्याची तक्रार कुठे कुठे व कशी करायची याबाबत हेल्पलाइन सेवा, व्हाट्सअप, फेसबुक, इतर सोशल मीडियावरील फसवणुकीपासून बचाव कसा करायचा याबाबत माहिती देणारी पत्रके वाटप करण्यात आली आहेत. याच अनुषंगाने महागाव येथील शिवाजीराव मोघे आश्रम शाळेत आयोजित एका कार्यक्रमात मंगेश भाऊ वानखेडे यांनी ही माहिती दिली. त्यांनाही गावागावातून खेड्या खेड्यातून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. सर्वत्र ठिकाणी विद्यार्थ्यांनी त्यांचे आभार व्यक्त केले आहेत.

# महादेव तांडा येथील सेल रिपॉवर प्रायव्हेट लिमिटेड सोलार कंपनीकडून शेतकऱ्यांची फसवणूक!

## भाडेपत्रावर जमीन घेऊन शेतकऱ्यांची फसवणूक; कंपनीकडून उडवाउडवीची उत्तरे

### शेतकऱ्यांचा बेमुदत आमरण उपोषण सुरू; प्रशासनाचे दुर्लक्ष? ;जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष देऊन न्याय द्यावा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । ज्ञानेश्वर उदावंत**



गेवराई : तालुक्यातील देवपिंपरी व कोमलवाडी शिवारातील महादेव तांडा येथे सेल रिपॉवर प्रायव्हेट लिमिटेड सोलार कंपनी स्थापन होत असून, कंपनी स्थापन करण्यासाठी कंपनीने शेतकऱ्यांकडून जमिनीचे भाडेपत्रा करून प्रत्येकाचे पाच ते सहा एकर जमीन ३० वर्षाच्या भाडेपट्ट्यावर घेतलेली असून, वर्षाला ८० हजार एकर प्रमाणे देण्याचे ठरलेले असल्याचे शेतकऱ्यांकडून सांगितले जात आहे. तसेच दोन वर्षाचे ८० हजार प्रमाणे दिले. व बाकीचे बॉन्ड करून देऊ असे कंपनीकडून आश्वासन दिले होते. परंतु आता भाडेपत्रावर जमीन दिलेल्या शेतकऱ्यांचा कंपनीने बंद केलेला आहे. यामुळे सदरील शेतकरी आज वार मंगळवार दि.११ फेब्रुवारी २०२५ रोजी पासून सेल रिपॉवर प्रायव्हेट लिमिटेड सोलर कंपनीच्या विरोधात बेमुदत आमरण उपोषणाला बसले आहेत.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, गेवराई तालुक्यातील महादेव तांडा येथे सेल रिपॉवर प्रायव्हेट लिमिटेड सोलार कंपनी स्थापन होत आहे. यासाठी या कंपनीचे अधिकारी शेख अफसर जब्रदिन यांनी त्याठिकाणी जाऊन शेतकऱ्यांसोबत चर्चा करून या कंपनीसाठी त्याठिकाणी राहणाऱ्या रविंद्र शिवाजी पवार, ज्ञानेश्वर सुखदेव जाधव, अविनाश अंबादास जाधव, रामनाथ गणपत जाधव, गणेश प्रल्हाद जाधव, अशोक अंबादास जाधव, अनिता रामनाथ जाधव, अभिजित रामनाथ जाधव, अंबादास शेकु पवार या शेतकऱ्यांची जमीन भाडेपत्रावर करून घेतली होती. परंतु भाडे पत्रावर जमीन दिलेल्या शेतकऱ्यांचा हप्ता कंपनीने बंद केल्याने कंपनीने शेतकऱ्याची फसवणूक केली असल्याचे शेतकऱ्याकडून सांगण्यात येत आहे. याप्रकरणी सदरील कंपनीचे अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांनी जॉब विचारला असता, तुम्हाला काय करायचे ते करा माझ्या हातामध्ये काही नाही तुम्ही कायद्याने काय करायचे ते करा असे सांगत धमकावले जात असल्याने शेतकरी मोठ्या संकटात सापडले आहे. तसेच या शेतकऱ्यांनी संबंधित कंपनीला वारंवार विनंती करूनही कंपनी टाळाटाळ करत असून उडवाउडवीची उत्तरे देत आहे. तसेच संबंधित कंपनीचे त्या ठिकाणी ऑफिस असून शेतकऱ्यांनी कर्मचाऱ्यांची भेट घेतल्यास आमच्याकडे काही नाही तुम्ही कंपनीकडे तक्रार करा असे म्हणत तुम्ही उपोषणाला बसलात तर आमचे कंपनीचे कर्मचारी व कंपनीचे काही गुंड लोक तुमचे हात पाय तोडतील अशी धमकी सदरील शेतकऱ्यांना देत असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. यामुळे सेल रिपॉवर प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या विरोधात सदरील शेतकऱ्यांनी बेमुदत आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे. उपोषणाचा आजचा पहिला दिवस असून याकडे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी गांभीर्याने लक्ष देऊन न्याय द्यावा अशी मागणी उपोषणकर्तांनी केली आहे.

# कोरेगाव भिमा येथे ऊस पाचट व्यवस्थापन व नैसर्गिक शेती कार्यशाळा उत्साहात संपन्न

## उसाचे पाचट हे सोन्यासारखे असून त्याचा योग्य वापर केल्यास जमिनीची सुपीकता वाढवता येते–विकास चव्हाण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हवेली | संतोष कदम**

कोरेगाव भिमा ग्रामपंचायत महाराष्ट्र शासनाच्या विविध योजना अंमलात आणणारी व जनहिताच्या योजना राबवणारी ग्रामपंचायत म्हणलं तरी वावग ठरणार नाही. महाराष्ट्र शासन कृषी विभाग, ग्रामपंचायत कोरेगाव भीमा आणि विविध विकास कार्यकारी सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने ऊस पाचट व्यवस्थापन व नैसर्गिक शेतीवर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती यावेळी शेतकऱ्यांनी शेती विषयक विविध विषयांचे मार्गदर्शन करण्यात आले तसेच शासकीय योजनांची माहिती देण्यात आली.

या कार्यशाळेत प्रमुख व्याख्याते विकास चव्हाण यांनी ऊस पाचट व्यवस्थापनाच्या प्रक्रिया सविस्तरपणे समजावून सांगितली. त्यांनी पाचट कुट्टीपासून पाचट पूर्णपणे कुजवण्यापर्यंतच्या पद्धती त्यांच्या प्रत्यक्ष शेतातील अनुभवावर आधारित सादर केल्या. उसाचे पाचट हे सोन्यासारखे असून त्याचा योग्य वापर केल्यास जमिनीची सुपीकता वाढवता येते, असे त्यांनी सांगितले.



यावेळी तालुका कृषी अधिकारी श्रीमती सुवर्णा आदक यांनी Agristak व इतर योजनांची माहिती दिली, तर धनश्री चासकर यांनी नैसर्गिक शेतीबाबत मार्गदर्शन केले.कार्यक्रमात प्रगतशील शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला तसेच ग्रामपंचायतीमार्फत जीवाणू औषधांचे वाटप करण्यात आले.कार्यक्रमाचे नियोजन कृषी अधिकारी प्रशांत दोरगे यांनी केले होते तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कंद यांनी केले, तर सरपंच संदीप ढेरंगे यांनी मान्यवर व शेतकऱ्यांचे आभार मानले.कार्यक्रमाला चेअरमन अशोक गव्हाणे, व्हाइस चेअरमन रामदास कांबळे, सरपंच संदीप ढेरंगे, उपसरपंच सविता घावटे,माजी पंचायत समिती सदस्य पी के अण्णा गव्हाणे,माजी उपसरपंच राजाराम ढेरंगे, कैलास सोनवणे, नारायण फडतरे, मा. सरपंच विजय गव्हाणे, अशोक काशीद, संजय काशीद, माजी चेअरमन पंडित ढेरंगे, अशोक गव्हाणे, देविदास गव्हाणे, पोलीस पाटील मालन गव्हाणे यांच्यासह अनेक ग्रामस्थ ,शेतकरी व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

> **“ कोरेगाव भिमा पंचक्रोशीतील प्रत्येक शेतकरी बांधवाच्या उज्ज्वल भविष्याच्या दृष्टीने – कृषी तंत्रज्ञान, योजना, अनुदान, कर्ज व बाजारपेठेतील सुधारणा यांच्यामार्फत आर्थिक समृद्धीची नवी दिशा निर्माण करण्याचा आमचा संकल्प आहे. आधुनिक ज्ञानाचे प्रशिक्षण, कृषी पर्यटनाचे आयोजन व उद्योगधंद्यांचे बळकट नेटवर्किंग यामुळे शेतकरी बांधवांची प्रगती त्यातून कृषी मालावर आधारित उद्योग धंदे उभारणाऱ्या शेतकरी उद्योग व उद्योजकांना भेटी देणे यासाठी प्रयत्न करणार आहे.**
>
> **– सरपंच संदीप ढेरंगे**

# नायगाव तालुक्यात बारावीच्या परीक्षेला कॉपी मुक्त वातावरणात सुरुवात

### ४९०३ पैकी ४८३५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली;परीक्षक अधिकारी रेंनगुंटवार कार्यरत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव | माधव बैलकवाड**

मंगळवार दिनांक.११ फेब्रुवारी पासून इयत्ता १२ वी च्या परीक्षेला सुरवात झाली असून नायगाव तालुक्यात ९ परीक्षा केंद्रावर ४९०३ विद्यार्थी पैकी ४८३५ परीक्षा दिली असून,६८ विद्यार्थी अनूपस्थित राहिल्याने ते परीक्षे पासून वंचित राहिले आहेत ही माहिती नायगाव परिरक्षक अधिकारी रेंनगुंटवार यांनी दिली.

तालुका प्रशासनाने योग्य ती खबरदारी घेऊन कॉपी मुक्त व तणाव मुक्त वातावरनात परीक्षा व्हाव्यात यासाठी कडक प्रशासन व कडक पोलीस बंदोबस्त अश्या अनेक उपाय योजले या साठी लागणारे आवश्यक उपाय



योजना राबवण्यात आल्याची माहिती नायगाव पं.स.चे गट शिक्षणाधिकारी संग्राम कांबळे यांनी दिली.

या वर उपाय योजना संदर्भात तहसीलदार डॉ.धम्मप्रिया गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली दक्षता समितीची नुकतीच बैठक घेण्यात आली होती व त्यात तालुका स्तरावर बैठे पथके तर तालुका व जिल्हा स्तरावरून वेगवेगळी पथके तयार करून उपाययोजना करण्यात आल्या आहेत असे ही कांबळे यांनी सांगितले. आज ९ केंद्रामध्ये जनता हायस्कूल नायगाव ८९० पैकी १५विद्यार्थी अनुपस्थित तर ८७५ विद्यार्थी यांनी परीक्षा दिली, साईबाबा विद्यालय २८५, विद्यार्थी परीक्षा दिली . यमुनाबाई विद्यालय ४६२,पैकी ४५८ तर ४ अनुपस्थित, दत्त कनिष्ठ विद्यालय २३८, पैकी ,२३७ तर १ अनुपस्थित,संत ज्ञानेश्वर विद्यालय २३१,पैकी ,२२४ तर ७आणुपस्थित, जवाहरलाल विद्यालय ८५१, पैकी८४५ तर ,६ अनुपस्थित , पोस्ट बेसिक आश्रम विद्यालय मरवाळी तांडा ७३१,पैकी ७२४ तर ७ अनुपस्थित, कुंटूर तांडा ९०५,पैकी८८३ विद्यार्थी परीक्षा दिली तर २२विद्यार्थी अनुपस्थित होते. राणी लक्ष्मीबाई विद्यालय ३१०, पैकी ३०४ तर ६विद्यार्थी अनुपस्थित होते असे एकूण ४९०३ पैकी ४८३५ विद्यार्थी यांनी परीक्षा दिली आहे.

# भारतीय बौद्ध महासभा जिल्हा सरचिटणीसपदी सतीश ओहोळ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा | ज्ञानेश्वर येवले**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या भारतीय बौद्ध महासभा या मातृसंस्थेच्या जिल्हा सरचिटणीस पदी सतीश ओहोळ यांची नालंदा बुद्ध विहार नालेगाव, अहिल्यानगर येथे पार पडलेल्या बैठकीत बहुमताने निवड करण्यात आली . यावेळी राष्ट्रीय सचीव तथा महाराष्ट्र प्रभारी भिकाजी कांबळे, राज्य सरचिटणीस अशोक केदारे, राज्य संघटक गौरव पवार आदि मान्यवर उपस्थित होते. सतीश ओहोळ हे सन १९९६ पासून संस्थेचे क्रियाशील सदस्य आहेत. त्यांनी जिल्हा उपाध्यक्ष जिल्हा सचिव इत्यादी पदावरती काम केलेले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना संस्थेने मोठी जबाबदारी दिली आहे.त्यानी अंधश्रद्धा निर्मूलन समिती, संविधान प्रचारक, राहुल विद्यार्थी वस्तीगृहाचे समन्वय, अशा अनेक सामाजिक संघटनेत काम केले आहे.जिल्हयात सामाजिक चळवळीत योगदान देत आहेत. त्यांनी अनेक गरीब कुटूबांना मदतीचा हात देतानाच विवाह प्रसंगीही मदत केली आहे. श्रीगोंदा येथील राहूल वसतीगृह चालवण्यात येणाऱ्या अडचणी स्वतः सोडवून विद्यार्थ्यांना



शैक्षणिक मार्गदर्शन ते करीत आहेत. त्यांना याकामी बहुजन शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा उत्कर्षाताई रूपवते यांचे मार्गदर्शन व खंबीर साथ मिळत आहे.

यावेळी बोलताना नवनिर्वाचित सरचिटणीस सतिश ओहळ म्हणाले संस्थेने माझ्या वर दिलेली जबाबदारी मी यशस्वी पणे पार पाडुन संस्थेच्या भरभराटीसाठी प्रयत्न करीन. त्यांच्या निवडीबद्दल जिल्ह्याभरातुन सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांसह सर्वच स्तरातील नागरीकांकडुन त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# आ.चिखलीकरांच्या पुढाकारातून देगलूर कृ.उ.बा.स.चे उपसभापती पंकज देशमुख, माजी सभापती अनिकेत पा.राजूरकर यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड | बाजीराव पा.गायकवाड**

लोहा विधानसभा मतदारसंघाचे आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वात आणिराष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत देगलूर तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती पंकज देशमुख, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती अनिकेत पाटील राजूरकर यांच्यासह अनेकांनी मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत प्रवेश केला. यावेळी आ. विक्रम काळे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

कंधार – लोहा विधानसभेचे आमदार तथा राष्ट्रवादीचे नेते प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वाखाली नांदेड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अधिक मजबूत आणि सक्षम करण्याचे मोठ्या नेटाने सुरू आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने पक्षाच्या संघटनात्मक बांधणीसाठी आ. चिखलीकर यांच्या मार्गदर्शनात जिल्ह्यातील अनेक भागातील विविध पक्षातील राजकीय पुढारी , नेते आणि



कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये दाखल होत आहेत. त्यातच देगलूर विधानसभा मतदारसंघातील देगलूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती पंकज देशमुख, देगलूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती अनिकेत पाटील राजूरकर, देगलूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक बाबुराव आखेमोड, देगलूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सायलू कोंडेवाड, माजी आमदार कै.गोविंदराव पाटील झरीकर यांचे पुतणे संजय पाटील झरीकर, माजी आमदार कै.गोविंदराव पाटील झरीकर यांचे नातू नांदेड दिशा नियोजन समितीचे सदस्य तथा झरी ग्रामपंचायतचे सरपंच धीरज रणजीतराव पाटील झरीकर, दिगंबर सावकार कौरवार, युवा कार्यकर्ते राहुल विजयराव पेंडकर, योगेश रामदास राऊलवार, किरण सूर्यकांतराव उल्लेवार, योगेश मष्णाजी मैलगिरे, बालाजी राजू नामावार, नागेश अनमुलवार, शुभम तुळशीराम मारकवाड, अनिकेत मोगलाजी अनमुलवार, बालाजी मोगलाजी अनमुलवार यांच्यासह अनेकांनी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत मुंबई येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यालयात पक्षप्रवेश केला. यावेळी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि आ.प्रतापराव पाटील चिखलीकर, आ.विक्रम काळे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केलेल्या नवीन पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्त्यांना आगामी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# तळेगाव-न्हावरे महामार्ग सिमेंट कॉंक्रिटीकरणचे काम निकृष्ट दर्जाचे

## संबंधित अधिकाऱ्यांनी लक्ष घालावे; उरळगाव ग्रामस्थांची मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हवेली | संतोष कदम**

रस्ते हे गावच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतात मात्र संबंधित अधिकाऱ्यांचं दुर्लक्ष असल्याकारणाने अनेक ठिकाणी निकृष्ट दर्जाचे काम होत असल्याचे चित्र पाहायला मिळते आहे.राज्य महामार्ग आणि उच्च वाहतूक असलेल्या ग्रामीण रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करण्यावर शासनाने विशेष लक्ष केंद्रित केले आहे. या रस्त्यांचा विकास आर्थिक वृद्धी आणि जलद वाहतुकीसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.याच माध्यमातून निखिल कन्ट्रक्शन ग्रुपच्या कंपनीकडून तळेगाव न्हावरे रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रीटीकरणाचे काम सुरू आहे. मात्र अत्यंत निकृष्ट दर्जाची कामे काही ठिकाणी सुरू असून यावर कोणा ही अधिकाऱ्याचे लक्ष नसल्याचे दिसून येत आहे.उरळगाव हद्दीतील मार्गाचे काम पाहता याची प्रचिती येत आहे. या कामामुळे प्रभागातील रहिवासी संताप व्यक्त करत आहेत.ग्रामीण भागाच्या विकासाच्या दृष्टीने हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा असून, या रस्त्याचे काम चांगल्या पद्धतीने व लोकांच्या सोयीचे होणे गरजेचे आहे. परंतु अनेक ठिकाणी चुकीच्या पद्धतीने व निकृष्ट दर्जाचे काम सुरु आहे.रस्त्याच्या कामात ठेकेदाराकडून योग्य साहित्य वापरले जात नाही. रोडच्या सबग्रेडच्या कामासाठी खडी टाईप कडक मुरूम न वापरता त्याऐवजी माती युक्त डस्ट



वापरली जात आहे. मातीचा आणि मोठ्या दगडांचा सर्रास वापर केला जात आहे आणि पाण्याचा वापर न करता तसेच रोलिंग केले जात असल्याचे उरळगावचे सोसायटीचे चेअरमन संतोष सात्रस, सामाजिक कार्यकर्ते शशिकांत कोकडे, ग्रामस्थांनी सांगितले.जनतेचा पैसा वाया जातो आहे आणि संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना त्याचे काहीच सोयरसुतक नाही. हा रस्ता केवळ ठेकेदाराला पोसण्यासाठी तयार करण्यात येत आहे का?असा सवाल उरळगाव ग्रामस्थांनी केला आहे.त्यामुळे संबंधित विभागांनी तात्काळ ठेकेदारास रस्त्याच्या कामातील त्रुटी, दोष दूर करून दर्जात्मक काम करण्याच्या सूचना द्याव्यात अशी मागणी या वेळी चेअरमन संतोष सात्रस,सामाजिक कार्यकर्ते शशिकांत कोकडे, ग्रामपंचायत सदस्य स्वप्नील गिरमकर, मा. तंटामुक्ती अध्यक्ष शिवाजी सात्रस,निलेश सात्रस,बाळासाहेब कोकाटे, बाबजी गिरमकर,ऋषी बांडे, नामदेव सावंत, साहेबराव डाळिंबकर,राजेंद्र जांभळकर, निलेश पोपळघट,दादाभाऊ सात्रस,ग्रामस्थांकडून करण्यात आली.

# लोहा शहरात विश्वकर्मा जयंती मोठ्या उत्साहात व विविध कार्यक्रमांनी साजरी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा | विशाल घंटे**

लोहा शहरात भगवान श्री विश्वकर्मा जयंती मोठ्या उत्साहात व विविध कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली. याप्रसंगी लोहा शहरातील देऊळ गल्ली येथून मुख्य रस्त्याने भगवान श्री विश्वकर्मा यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक मुख्य रस्त्याने मोंढा मार्ग हळदव रोड येथील श्री विश्वकर्मा मंदिराच्या नियोजित जागेत विसर्जन करण्यात आले. त्यानंतर भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करुन प्रसिद्ध किर्तनकार भागवताचार्य श्री हभप ज्ञानेश्वर महाराज पुर्णेकर यांच्या हरि किर्तनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्यंकट जळबाजी पांचाळ होते तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार रोहिदास चव्हाण, माजी उपनगराध्यक्ष शरद पाटील पवार,, आदी मान्यवर होते. यावेळी भागवताचार्य श्री हभप ज्ञानेश्वर महाराज पुर्णेकर यांनी आपल्या हरि किर्तनातुन भाविक भक्तांना मंत्रमुग्ध केले.

यावेळी भागवताचार्य श्री हभप ज्ञानेश्वर महाराज पुर्णेकर म्हणाले की, विठ्ठल – रुक्माई, विठ्ठल – रुक्माई पुण्याची गणना कोण करी, समाजात तीन बुध्दीची माणसे असतात एक –यांनी काय केले त्यांनी काय केले . त्यांचे अस झाल तस झाल असे एक दुसऱ्याशी बोलतात त्यांची निंदा करतात,दोन – मध्यम बुध्दीची या प्रकारच्या बुध्दीची माणसे भेटल्यावर एकमेकांशी काय फायदा आहे यावर चर्चा करतात व आपला फायदा बघतात ,तीन – श्रेष्ठ बुध्दीची माणसे – ही माणसे सर्व समाजाचा विचार करतात जत्यांचे भले झाले पाहिजे असा विचार करतात. यात आपण कोणत्या प्रकारचे आहोत तपासा. संत हे परीस आहेत ते लोकांचे ही सोने करतात. संत तुकाराम महाराज म्हणतात तुम्ही मला बघितले. आपण विश्व निर्मात्यांचे लेकर आहोत. लोहा येथे



विश्वकर्मा समाजाची एकी आहे . लोह्यासारखी इतकी चांगली विश्वकर्मा जयंती कुठे ही साजरी होत नाही. आता विश्वकर्मा मंदिरासाठी जागा घेतली. आता विश्वकर्मा मंदिर बांधकामासाठी प्रत्येकांनी दररोज १० रुपये म्हटलं तर वर्षाला ३ हजारांच्या वर होतात आपल्याला जसे जमेल तसे दान करा. संत हे पाखंड नष्ट करायला आलेत. नाम स्मरण करून चालणार नाही. नामाची बीज वाढवावी.आपण गरीब नाहित तुमची मानसिकता गरीब आहे. जो पर्यंत तुमची मानसिकता श्रीमंत होत नाही तोपर्यंत कोणतेही काम होत नाही . धर्माचे पालन करावे बीज वाढवावे असे भागवताचार्य श्री हभप ज्ञानेश्वर महाराज पुर्णेकर म्हणाले. तसेच यावेळी भगवान श्री विश्वकर्मा जयंती निमित्त रक्तदान हेच जीवदान वाचवी रुग्णांचे जीवदान हे घोषवाक्य घेऊन सामाजिक बांधिलकी जोपासत लोहा शहरात भगवान श्री विश्वकर्मा जयंती निमित्त आयोजित भव्य रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असुन यावेळी २०जणांनी रक्तदान केले. सदरील कार्यक्रम यशस्वीतेसाठी भगवान श्री विश्वकर्मा जयंती मंडळाचे जयंती मंडळाचे अध्यक्ष राजू गोविंद सूर्यवंशी दत्ता पांचाळ नामानंद रामेश्वर स्वप्निल पांचाळ देवानंद पांचाळ संतोष पांचाळ दिगंबर पांचाळ वैजनाथ पांचाळ पोलीस पाटील माधव पांचाळ अंतेश्वरकर मार्गदर्शक रमेश पांचाळ, संयोजक राम पांचाळ मंगरुळकर, माधव पांचाळ, सोपान पांचाळ, विठ्ठल पांचाळ, जयंती मंडळाचे अध्यक्ष , उपाध्यक्ष,सचिव यांच्या सहित सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले. यावेळी लोहा येथील सर्व विश्वकर्मा समाज बांधव, महिला भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमांचे सूत्रसंचालन पोलिस पाटील वैजनाथ पांचाळ यांनी केले तर आभार बालाजी पांचाळ यांनी मानले.

# प्रसिद्ध कवी प्रा.सय्यद अल्लाउद्दीन यांच्या शासन पुरस्कार प्राप्त पाच पुस्तकांच्या तिसरी आवृत्ती

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**

आष्टीचे प्रसिध्द कवी प्रा.सय्यद अल्लाउद्दीन यांच्या अंगठे बहाद्दार झिंदाबाद,बाप पिकवितो घास, त्याला गळफास, आई तुझं लेकरू या तीन बालनाटकांसह बबलू–छबलू,आई माझी नातवांची आजी या दोन बालकविता संग्रहाला महाराष्ट्र शासनाचे उत्कृष्ट साहित्य निर्मिती पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. दिलजान प्रकाशनच्यावतीने या पाच बालसाहित्य पुस्तकांच्या तिसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन लवकरच होणार आहे. प्रौढ साहित्य प्रकारातील झिंदाबाद.. मुर्दाबाद,जमावबंदी,उचल कोयता तोडीला,अजून मारेकरी सापडत नाही ही पुस्तके त्यांची गाजलेली असून, कोण म्हणतो लोकशाही आलीच नाही ? कवितेच्या लोकप्रियतेमुळे ते महाराष्ट्राला सुपरिचित आहेत.त्यांच्या कविता संग्रहासाठी माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील,ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त कवीश्रेष्ठ कुसुमाग्रज, विंदा करंदीकर, गिरीश कर्नाड, भालचंद्र नेमाडे यांच्या शुभेच्छा त्यांना लाभलेल्या आहेत.कवी ग्रेस, शिवाजी सावंत,राम शेवाळकर,अनंत यादव, यु.म.पठाण, सुधीर रसाळ,फ.मुं. शिंदे, हृदयनाथ मंगेशकर यांनी त्यांच्या कवितांचे कौतुक केले आहे.



# ग्रामीण वधू-वर पित्यांच्या शोधमोहिमा ;यंदा तरी हळद लागेल का ?तिशीपार तरुण प्रतीक्षेत

लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार | दौलत पांडागळे**

यंदा कर्तव्य आहे म्हणत ग्रामीण भागातील वधू – वर मातापित्यांची शोधमोहीम सुरू झाली आहे. आपल्या मुलांमुलींसाठी चांगला जोडीदार शोधून कर्तव्यमुक्त होण्यासाठी आप्त पाहुण्याकडील भेटीगाठी वाढल्या आहेत.विवाह हा आयुष्यातील महत्वाचा भाग असल्याने वधू आणि वरपक्षाकडून नात्यागोत्यात चाचपणी सुरू आहेत.मात्र विवाहासाठी नौकरीला प्राधान्य मिळत असल्याने अनेकांचे विवाह रखडल्याचे चित्र आहे.

कंधार तालुक्यातील ग्रामीण भागात मागील दोन वर्ष कोरोनाच्या अभूतपूर्व परिस्थितीमुळे विवाहाला अडचणी आल्या.लग्नसमारंभ मोठा करायचा आपल्याला काय एकुलता एक किंवा एकुलती एकच आहे.यामुळे विवाह थाटामाटात झाला पाहिजे अशी बहुतांश पालकांची अपेक्षा होती.यात कोरोनाची दोन वर्ष निघून गेली.कोरोनामुळे जग थांबले परंतु वय वाढतच राहिले याचा फटका नववधूवरांना बसला.जुळून येणारे विवाहयोग विस्कटले आणि आता नव्याने शोधमोहिमा सुरू झाल्या आहेत.सद्यस्थितीत वाढत चाललेली बेरोजगारी आणि वधू पित्यांचा वर म्हणून पाहिजे असलेले निकष यामुळे तुरळकच स्थळांची जुळवाजुळव होताना दिसत आहे. एकुलता एक मुलगा,सरकारी नोकरी,चांगली शेतीबाडी शिवाय तो देखनाही असावा अश्या निकषात बसला तरच पुढचा विचार करू असा निरोप दिला–घेतला जात आहे.तर वधु च्या बाबतीतही मुलगी देखणी व उच्चशिक्षित असावी यात भर म्हणून नोकरी असेल तर उत्तमच असेही सूर ऐकायला मिळत आहेत.ग्रामीण भागात तर कर्ज काढू पण विवाह मात्र साजेसा झाला पाहिजे यासाठीची वधू पित्यांच्या आर्थिक तजवीज चालू आहेत.परंतु ग्रामीण भागात असेही वर आहेत ज्यांनी साधारणतः वयाची तीस वर्ष पार करूनही विवाहयोग कधी जुळून येईल याची प्रतीक्षा करत आहेत.



# डॉ.बाबासाहेब आंबेडकर अध्यापक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा आंतरवासिता शिबीराची सुरुवात!



लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार | धोंडीबा मुंडे**

महात्मा फुले ग्रामीण विकास सेवाभावी संस्था सोनवळा संचलित कंधार येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर अध्यापक विद्यालयातील छात्र विद्यार्थ्यांच्या आंतरवासिता शिबीराची दि.११ फेबुवारी २०२५ पासुन महात्मा फुले प्राथमिक शाळा कंधार या शाळेत सुरुवात प्राचार्य एस.एन नागरगोजे यांच्या उपस्थितीत आणि मुख्याध्यापक दिगांबर वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले,जिवनात अनुभवाची शिदोरी म्हणजे यशाची गुरुकिल्ली असल्याचे मार्गदर्शन दिगांबर वाघमारे यांनी केले.

अध्यापक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अध्ययन आणि अध्यापन प्रकीया कशी करावी,शिकवताना येणाऱ्या अडीअडचणी समजून घेण्यासाठी सदरील आंतरवासिता शिबीराची गरज असल्याचे प्रतिपादन प्राचार्य एस.एन नागरगोजे यांनी आपले प्रास्ताविक आणि मनोगतातून केले शिबीरासाठी महात्मा फुले प्राथमिक शाळा उपलब्ध करून दिल्या बद्दल संत गाडगेबाबा शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा डी एन केंद्रे,सचिव चेतनभाऊ केंद्रे,संचालिका सौ अनुसया गिते आणि मुख्याध्यापक दिगांबर वाघमारे यांचे आभार मानले.

**आंतरवासिता शिबीराचे मुख्याध्यापक कु.अंकिता नरवाडे, उपमुखाध्याक नागेश केंदे यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला,शिबीराची सुरुवात माता सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करून करण्यात आले यावेळी सौ कागणे यु.एम,आगलावे ए.बी,केंद्रे. आर. एस चंद्रकला तेलंग,आदीची उपस्थिती होती,**

**कार्यक्रमांचे सुत्रसंचलन सौ.सिमा सोनटक्के यांनी केले आंतरवासिता शिबीरासासाठी नरवाडे अंकीता, महेश गोविंदराव गायकवाड,सानप श्रद्धा उतम,सोनटके सीमा यशवंत,सानप ममता मारोती , गिते ज्ञानेश्वरी सदाशिव , येडके तेजस्विनी किशन,राऊत मोहन विठल,गर्जे संतोष, निलेवाड पूजा गणपत,केंद्रे श्रृती गोविंद,गिते बालीजी,मुंडे रवि मारोती, केंद्रे रुषीकेश,केंद्रे रामेश्वर,पिंपळदरे गोविंद ,केंद्रे आरती,गिते बालाजी,केंद्रे दिव्या,केंद्रे नागेश,ओंकार जायभाये यांनी सहभाग घेतला,सदर शिबिर पाच दिवस चालणार असल्याचे माहिती छात्र मुख्याध्यापिका कु.अंकिता नरवाडे यांनी दिली .**

# अध्यापक महाविद्यालयाचे सराव पाठ संपन्न



लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**

शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यापक महाविद्यालय आष्टी जिल्हा बीड येथील व्दितीय वर्ष प्रशिक्षणर्थ्यांचे वार्षिक पाठ छत्रपती शिवाजी विद्यालय आष्टी या ठिकाणी दिनांक ५/२/२०२५ ते ८/२/२०२५ या दरम्यान पार पडले.सर्व प्रशिक्षार्थ्यानी अतिशय उत्कृष्ट पाठ घेतले.त्यांना प्राचार्य केदार,प्रा जाधव यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.महाविद्यालयाचे प्रा.बोडखे, प्रा.निशिगंध.आडकर,दिपक शिंदे यांनी अंतर्गत परीक्षक म्हणून काम पाहिले तर छत्रपती शिवाजी विद्यालय येथिल येवले, भोसले,कारंजकर ,विधाते,गर्जे, बनकर,यांनी बहिस्थ परिक्षक म्हणून काम पाहिले . विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी किरण शिनगिरे, गोकुळ गावडे, अमोल शेलार, सचिन पवार, दीपक बोडके, हनुमान जाधव, पूजा नन्नवरे, कांचन थेटे,शिल्पा घायतडक, गिरमे वनिता,खाडे प्रिती,तांब्रे मीनाक्षी,आदी विद्यार्थी उपस्थित होते.कार्यशाळा उत्स्फूर्तरीत्या संपन्न झाली.विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री संतोष थोरवे यांनी पाठ घेण्यासाठी शाळा उपलब्ध करून दिल्याबद्दल प्राचार्य केदार सर यांनी त्यांचे आभार मानले.

# भोकर येथे बारावी बोर्डच्या परिक्षेस प्रारंभ;०३ परीक्षा केंद्रावर ०१ हजार १९२ विद्यार्थी देताहेत आहेत बारावी बोर्डाची परीक्षा

**शिक्षण संचालकांची परीक्षा केंद्रास भेट**

**पुण्याचे शिक्षण संचालक सूर्यवंशी उपशिक्षणाधिकारी बनसोडे उपशिक्षणाधिकारी गंजेवार यांनी भोकर येथील शाहू विद्यालय येथी सुरू असलेल्या १२ वी परीक्षा केंद्रास अचानक भेट देऊन परीक्षा केंद्राची पाहणी केली.यावेळी परीक्षा सुरळीत व शांततेत चालल्याचे पाहून समाधान व्यक्त केले. व आवश्यक त्या सूचना केल्या.**

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकर | रमाकांत जोशी**

तालुक्यात बारावी बोर्डाच्या परीक्षा अत्यंत सुरळीत व कॉपीमुक्त वातावरणात सुरू झाल्या असून भोकर शहरातील ०३ परीक्षा केंद्रावर ०१ हजार १९२ विद्यार्थी परीक्षा देत असल्याची माहिती भोकर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी सुधीर गुटे यांनी दिली. या परीक्षा शहरातील श्री शाहू विद्यालय येथे २८५ विद्यार्थी,डी.बी.कॉलेज येथे ५११ विद्यार्थी तर कै.लक्ष्मणराव घिस्सेवाड हायस्कूल येथे ३९६ विद्यार्थी असे एकूण ०१ हजार १९२ विद्यार्थी परीक्षा देत आहेत.या परीक्षा भयमुक्त व कॉपीमुक्त वातावरणात पार पडण्यासाठी सर्व केंद्रावर भरारी पथके,बैठे पथके,तसेच ०५ रनर नेमण्यात आली आहेत.तरीही परीक्षा केंद्रावर काही समस्या उद्भवल्यास स्थापन करण्यात आलेल्या परिरक्षक कार्यालयाशी संबंधितांनी संपर्क साधावा असे आवाहन गटशिक्षणाधिकारी सुधीर गुटे यांनी केले आहे.

**बारावी इंग्रजी पेपर उपस्थित**

**डी बी कॉलेज भोकर ५१० पैकीं ५०६**
**शाहू विद्यालय भोकर ३९६पैकीं ३९१**
**कै.घिसेवाड हायस्कूल,**
**भोकर २८५पैकी २७८**
**परीक्षेस एकूण अनुपस्थिती विद्यार्थी १६**



हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904